# के. के. वाघच्या जर्मनी येथील माजी विद्यार्थी मेळाव्यास १५० हून अधिक माजी विद्यार्थ्यांची हजेरी

## जर्मनीतील बर्लिन, मुनीच आणि फ्रँकफर्ट शहरात माजी विद्यार्थी मेळावा




**नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेचे स्थापनेपासून ७० हजारांहून अधिक माजी विद्यार्थी देश-परदेशात विविध पदावर कार्यरत आहेत. जगाच्या कान्याकोपऱ्यात संस्थेचा व नाशिकचा नाव उंचावत आहेत. अशाच माजी विद्यार्थ्यांसाठी संस्थेतर्फे माजी विद्यार्थी मेळावा साजरा केला जातो. त्याअनुषंगाने नुकताच जर्मनी येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी सुमारे १५० हून अधिक माजी विद्यार्थी होते.**

सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी जर्मनीमधील बर्लिन, मुनीच आणि फ्रँकफर्ट या शहरांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळाव्याचे आयोजन केले. या व्यतिरिक्त काही माजी विद्यार्थी यांचे कुटुंबीय देखील उपस्थित होते.

मेळाव्यास बर्लिन येथे जर्मन रेल्वे कंपनीचे मॅनेजर यज्ञेश भोर, मुनीच येथे पबमॅटिक कंपनीचे असोसिएट डायरेक्टर निनाद जोशी तर फ्रँकफर्ट येथे बॉश कंपनीचे एसएपी सल्लागार नितीन मेनन यांनी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी.के. शहाबादकर व मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. पी. बी. कुशारे यांचे स्वागत केले.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. व के. के. वाघ संस्थेच्या वाटचालीबद्दल माजी विद्यार्थ्यांना अवगत केले. संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी संस्थेत घेण्यात येणारे नवनवीन उपक्रमांबद्दल माहिती दिली. तसेच डॉ. पी. के. शहाबादकर यांनी इंडस्ट्री इन्स्टिटयूट इंटरॅक्शन बद्दल सांगितले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी मनोगतामध्ये संस्थेविषयी असलेले प्रेम आणि जिव्हाळा व्यक्त करत संस्थेचे आभार मानले. त्यांच्या आयुष्यात मिळालेल्या यशाचे श्रेय त्यांनी सर्व शिक्षक वर्गाला व संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांना दिले. माजी विद्यार्थ्यांमधील अनेकजण जर्मनी मध्ये कार्यकारी संचालक, एम डी, जनरल मॅनेजर, सीईओ आदी उच्च पदावर काम कार्यरत आहेत. जर्मनी येथे प्रसिद्ध असलेल्या आरडब्लूइ रिन्यूएबल्स युरोप अँड ऑस्ट्रेलिया जीएमबीएच, जर्मन रेल्वेस, स्मार्टडिंग्स, ॲमेझॉन, हिताची एनर्जी आदी कंपन्यांचे संस्थापक हे संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली.

बहुतांश माजी विद्यार्थी जर्मनीमधील नामांकित विद्यापीठामध्ये मास्टर डिग्री शिकत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार डॉ. पी. बी. कुशारे यांनी मानले.

Gavkari 25-10-2024